# नियमित दिवाणी दावा क्रमांक ८०/२०२० मधील
# निशाणी २२ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१ श्रीरंग भानुदास अंबुरे हे दि.३१.०५.२०२१ रोजी मयत झाले आहेत. परंतु, प्रतिवादी क्र.१ हे कोरोना काळामध्ये मयत झाल्याने व त्यावेळी न्यायालयाचे कामकाज बंद असल्याने, तसेच, वादी हे त्यांची उपजिवीका भागविण्यासाठी बाहेरगावी गेल्याने त्यांना प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झाला आहे. त्यामुळे, त्यांचे विरुध्द दावा तांत्रिकदृष्टया अबेट झाला आहे. प्रतिवादी क्र.३ ते ७ व ९ ते १२ यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी यांनी अर्जाच्या पुष्टयर्थ शपथपत्र दाखल करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. अभिलेखातील निशाणी २८ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहता प्रतिवादी क्र.१ हे दि.३१.०५.२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्यावेळी कोरोना महामारीमुळे न्यायालयीन कामकाज बंद होते, ही बाब खरी आहे. त्यामुळे, वादी यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा मालकी हक्क शाबितीसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे सुरु राहते. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांचे वारस याकामी अभिलेखावर आणणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. त्याकरीता वादी यांचेविरुध्द तांत्रिकदृष्टया झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे देखील न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा निशाणी २२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे वादी

यांचेविरुध्द तांत्रिकदृष्टया झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

-

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.06.21 17:41:19 +0530

दिनांक : २१.०६.२०२२ (डी.एम.हिंग्लजकर)

ठिकाण : वडवणी. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,
ता. वडवणी, जि.बीड.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 21.06.2022 |
| Transcribed on | : | 21.06.2022 |
| Checked and signed on | : | 21.06.2022 |